
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 1 | OCTOBER - 2025

# दलित साहित्य व पुस्तकांचं विश्व

डॉ. श्रीराम इंदिरा यशवंत गडकर
मराठी विभाग, विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
विद्यानगरी, बारामती, जि. पुणे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मिती झाली. अस्पृश्य - दलित आणि मागास जाती-जमातींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले आत्मभान दलित साहित्याच्या निर्मितीला प्रेरक ठरले. त्याआधी महात्मा जोतीराव फुले यांनी सडेतोडपणे सनातनी विचारांची चिकित्सा सुरू केली. त्यामुळे त्यांचा समतेचा लढा गतिमान झाला. जातिभेद नष्ट व्हावेत, स्त्री-पुरुष भेद नष्ट व्हावा, सत्यधर्माची उपासना व्हावी असे त्यांचे तत्त्वज्ञान होते. त्यांनी विषमतेवर कडाडून हल्ले चढविले आणि स्वातंत्र्य, समता, बंधुत्त्व या मूल्यांवर अधिष्ठित अशी नवी समाजरचना निर्माण करण्यासाठी लढा उभा केला. महात्मा जोतीराव फुले यांच्या लढ्याबद्दल धनंजय कीर म्हणतात, "जोतीरावांनी ब्राह्मणी धर्माच्या स्वार्थी तत्त्वांवर जो हल्ला चढविला तो अचूक आणि अजोड होता. ब्राह्मणी धर्माची परिणती सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक विषमतेत होऊन, समाज व्यवस्थेत ब्राह्मणांना प्रतिष्ठा, सत्ता नि देवपण प्राप्त झाले होते. त्यांच्या सत्तेचे मूळ त्यांच्या स्मृती, श्रुती आणि पुराणे यात होते. हे जाणून त्यांच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गांची मुक्तता करण्यासाठी त्यावर जोतीरावांनी हल्ला चढविला आणि सामाजिक न्याय, बुद्धिप्रामाण्य व मानवी समानता या तत्त्वांवर समाजाची उभारणी करण्यासाठी लढा केला." ❶ (धनंजय कीर, 'महात्मा जोतीराव फुले' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. चौथी आवृत्ती १९९२, पुनर्मुद्रण १९९६, प्रस्तावना, पृ. क्र. १०) महात्मा जोतीराव फुले यांच्या तत्त्वज्ञानामुळे दलित साहित्याने महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांना प्रमाण मानले. शिवाय महात्मा जोतीराव फुले हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गुरू होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि त्यांची चळवळ ही दलित साहित्याची प्रेरणा आहे. त्यांचा दलित मुक्तीचा लढा हा मानव मुक्तीच्या लढ्याचा एक भाग होता.

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या विचारांतूनच दलितांना क्रांतीचे वेध लागले. Columbia University (M.A in Political Science - 02.06.1915), Columbia University (Ph. D. - June 1917 - Title : 'The National Dividend of India : A Historical & Analytical Study'), Barrister at Law (30/09/1920 - Gray's Inn, London - Law Qualification for a Lawyer in Royal Court of England), M. Sc. (June 1921 - London School of Economics & Political Science - Provincial Decentralization of Imperial Finance in British India), D. Sc. (Nov. 1923 - London University, London School of Economics, London (Doctor of Science, The Problem of the Rupee : Its Origin and Its Solution), L. L. D. (05/06/1952, Columbia

University, New York - Doctor of Laws For his Achievements, Leadership & Authorizing the Constitution of India), D. Litt. (12/01/1953, Osmania University, Hyderabad - Doctor of Literature For his achievements, leadership and writing the constitution of India), इ. पदव्यांच्या माध्यमातून प्राप्त केलेले सर्वोच्च शिक्षण व प्रकांड पांडित्य; मुंबई येथील सिडेनहॅम कॉलेज येथे केलेली कॉमर्सची प्राध्यापकी (१९१८), *'मूकनायक (३१ जानेवारी १९२०), बहिष्कृत भारत (३ एप्रिल १९२७), समता (२९ जून १९२८), जनता (२४ जून १९३०), प्रबुद्ध भारत (४ फेब्रुवारी १९५६)' ही नियतकालिके;* 'बहिष्कृत हितकारिणी सभा' (शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा) (२० जुलै १९२४), विधी मंडळ सदस्य (नियुक्ती,३ एप्रिल १९२७), 'समाज समता संघ' (१९२७), समता सैनिक दल (३ मार्च १९२७), चवदार तळे सत्याग्रह (महाड, २० मार्च १९२७), अंबादेवी मंदिर आंदोलन (२६ जुलै १९२७, अमरावती), मनुस्मृतीचे दहन (महाड, २५ डिसेंबर १९२७), धनगर समाज परिषद (४ मार्च १९२८, बारामती), 'महार वतन कायदा - १८७४' (१९ मार्च १९२८), डिप्रेस्ड

क्लास एज्युकेशन सोसायटी (१४ जून १९२८), भारतीय बहिष्कृत सेवा समिती (१९२९), सार्वजनिक गणेशोत्सव (दादर, १९२९), पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह (पुणे,२२ सप्टेंबर १९२९), काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह (नाशिक, २ मार्च १९३०), तीनही गोलमेज परिषदांना हजर (१२ नोहेंबर १९३०, २६ जानेवारी १९३१, १७ नोहेंबर १९३२), पुणे करार (येरवडा, २४ सप्टेंबर १९३२), येवला (जि. नाशिक – घोषणा : "मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही." - १३ ऑक्टोबर १९३५), मजूर पक्षाची स्थापना (Labor Party of India, १६ ऑगस्ट १९३६), विरोधी पक्षनेते (मुख्यमंत्री मा. बाळासाहेब खेर, १९३७), अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद (मनमाड, फेब्रुवारी १९३८), All India Scheduled Caste Federation, नागपूर - प्रेरणा अप्पा दुराय, १९ जुलै १९४२), कामगार मंत्री (कामगारांच्या हिताचे अनेक कार्यक्रम व कायदे, १९४२-१९४६), Peoples Education Society (८ जुलै १९४५ - सिद्धार्थ वाणिज्य महाविद्यालय, मुंबई व मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद), अध्यक्ष राज्यघटना मसुदा समिती (२९ ऑगस्ट १९४७ - २ वर्षे, ११ महिने, १८ दिवस लेखन), पहिले मजूर मंत्री व कायदा मंत्री (१९४७ - १९५१), हिंदू कोड बील (१९४८), संविधान सादर (२६ नोव्हेंबर १९४९), संविधानाची अंमलबजावणी (२६ जानेवारी १९५०), (जगभरातील ७७ – अंदाजे - संविधानांचा / घटनांचा अभ्यास, ७७ – अंदाजे - संविधानांचा / घटनांचा अर्क म्हणजे आपले संविधान, भारतीय स्वातंत्र्यानंतर आयर्लंड, चीन, श्रीलंका, ब्रम्हदेश, जपान, इस्त्राईल, संयुक्त अरब अमिरात - U.A.E., इ. १०-१२ देशांच्या संविधानांनी भारतीय संविधनाचे अनुकरण केले), जागतिक बौद्ध धम्म परिषद, (कोलंबो, श्रीलंका - १९५०), बौद्ध धम्म स्वीकारण्याची घोषणा व निर्धार (२७ मे १९५३, नरे पार्क, मुंबई), जागतिक बौद्ध धम्म परिषद, काठमांडू – नेपाळ, १९५४), भारतीय बौद्ध महासभा (४ मे १९५५), 'Republican Party of India' घोषणा (१९५६), बौद्ध धम्म - स्वीकार (दीक्षाभूमी, नागपूर - १४ ऑक्टोबर १९५६), 'महापरिनिर्वाण' (६ डिसेंबर १९५६ - ६५ वर्षे, ९ महिने, २२ दिवस), 'भारतरत्न' (१४ एप्रिल १९९०), जन्मशताब्दी वर्ष - 'सामाजिक न्याय वर्ष' (भारत सरकार), Bistal Stamp चवदार तळे सत्याग्रह (चित्र, १९९०-१९९१), इ. कृतीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले हे महान कार्य; Castes in India (1916), Federation Verses Freedom (1939), Thoughts on Pakistan (1940), The Untouchables (1945), Who Were Shudras (1946), States & Minorities (15/03/1947), Riddles in Hinduism (1951), Buddha & His Dhamma (Writing - 1954, Publishing - 1957), इ. ग्रंथांची निर्मिती; 'वाचाल तर वाचाल,' 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा,' 'शिक्षणाबरोबर शीलही सुधारले पाहिजे,' 'शहराकडे चला,' 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही,' 'स्वाभिमान, स्वावलंबन, आत्मोद्धार' - त्रिसूत्री, 'मार्क्सवादाला पर्यायी व्यवस्था निर्माण करायची असेल तर बौद्ध धम्माशिवाय पर्याय नाही.' इ. आपल्या कृतीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना दिलेले संदेश; 'तथागत गौतम बुद्ध, महात्मा कबीर, महात्मा जोतीराव फुले' या तीन महामानवांना मानलेले गुरू; इ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक पैलूंमुळे, अनेक

घटनांमुळे शोषित दलित वर्ग सावध झाला, जागृत झाला. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदेशाप्रमाणे दलित तरुण शिकला, संघटित झाला, संघर्ष करू लागला, चळवळ करू लागला. चळवळीसाठी वैचारिक अधिष्ठान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानातून घेऊ लागला. दलित साहित्याने 'माणूस' हेच मूल्य स्वीकारले आहे. माणसाची प्रतिष्ठा, माणसाचं स्वातंत्र्य या पैलूंना दलित साहित्य केंद्रस्थानी मानते. २ मे १९५४ रोजी विदर्भ साहित्य संघ, नागपूर येथे साहित्यिकांपुढे केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "आपण आपल्या जीवनाकडे, कर्तव्यधर्माकडे आणि संस्कृतीकडे दुर्लक्ष करीत आहोत. थोडे अंतर्मुख होऊन विचार केला तर आपली जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये कशी करपून जात आहेत याचे भेसूर चित्र उभे राहील, कारणं काहीही असोत पण आपण अधःपतनाच्या, अवनीतीच्या मार्गावरून जात आहोत असंच आढळून येईल. तेव्हा तत्परतेने सावध होऊन जीवन व संस्कृतीविषयक मूल्ये साहित्यकारांनी जोपासली पाहिजेत, ती सतेज बनविली पाहिजेत, वृद्धिंगत केली पाहिजेत. तुमच्या कथा कादंबऱ्यातील सीता आता लक्ष्मणरेषा ओलांडून जात आहेत ! दुर्योधनाच्या दरबारात द्रौपदीचे वस्त्रहरण होत आहे आणि दुष्यंत शकुंतलेला ओळख देत नाही. ती वनवासी होत आहे. म्हणून मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्यप्रकारांतून आविष्कृत करा. आपलं लक्ष्य आकुंचित, मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरतीच बंदिस्त करू नका. तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचं, दलितांचं फार मोठं जग आहे हे विसरू नका. त्यांचं दुःख, त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे." ❷ (डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ', नागपूर विद्यापीठ, नागपूर. आवृत्ती पहिली - १४ एप्रिल १९९१, पृ. क्र. १४७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून प्रेरणा घेणाऱ्या दलित साहित्याच्या चळवळीला विकसित करण्याची शक्ती महात्मा जोतीराव फुले यांच्यापासून मिळाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील आत्मभान आलेल्या नवशिक्षित दलितांच्या हाती जोतीरावांचे संपादित समग्र वाङ्गय पडले आणि महात्मा फुले यांचे विचारधन दलित साहित्याच्या चळवळीचे उर्जाकेंद्र झाले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतरामुळे दलितांनी हिंदू धर्माचा त्याग केला. हिंदू देव-देवतांचा त्याग केला. हिंदू धर्मातील रूढी, परंपरा, प्रथा नाकारल्या. गावकीची कामे सोडून दिली. या धार्मिक उलथापालथीतून दलितांना स्वत्व मिळाले 'आम्ही आता बौद्ध झालो आहोत. त्यामुळे हिंदू धर्माने आमच्यावर लादलेली हीन कामे यापुढे आम्ही करणार नाही' अशी नवी जाणीव संपूर्ण दलित समाजात जागृत झाली. या सांस्कृतिक संक्रमण काळात दलित साहित्याच्या चळवळीने मूळ धरले. यामुळेच दलित साहित्याची चळवळ आकाराला आली. कविता, कादंबरी, नाटक, कथा, आत्मकथन, वैचारिक लेखन, इ. हे या चळवळीचे विविध पैलू आहेत.

## दलित साहित्यामुळे मराठी साहित्यविश्व बदलले -

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बहुजनांची पिढी शिक्षणामुळे लेखन करू लागली. या लेखनामुळे मराठी साहित्यविश्वामध्ये दलित, आदिवासी, ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी, विज्ञानवादी, इ. विविध वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. दलित जाणीव असलेला दलित साहित्यिक दलितांवरील अन्याय, अत्याचार यांचे चित्रण आपल्या लेखनातून करू लागला. ज्या दलित जीवनाची साधी ओळखही पांढरपेशा लोकांना नव्हती त्या दलित जीवनाचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे दलित साहित्याच्या रूपाने होऊ लागले. प्रारंभीच्या काळात दलित लेखकांचे लेखन सवर्ण प्रकाशक, संपादक प्रसिद्ध करत नव्हते. दलित लेखकांच्या लेखनाची साधी दखलही घेतली जात नव्हती. तरीही दलित लेखक लिहीत होते. २ मार्च १९५८ रोजी दादर येथील बंगाली हायस्कूलच्या सभागृहात दलित लेखकांचे पहिले संमेलन भरले होते. या संमेलनाचे उद्घाटन करताना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हणतात, "एका झाडाखाली तीन दगडांची चूल करून मडक्यात अन्न शिजवून दोन मुलं आणि बायको यांना जगविणारा हा दलित वरवर कंगाल दिसला तरी

त्याची संसार करण्याची इच्छा पवित्र अशीच असते. कुंटुंबव्यवस्थेवरचा त्यांचा विश्वास मुळीच ढळलेला नसतो. परंतु त्यांची कुंटुंबसंस्थाच भांडवलदारी जगाने त्या झाडाखाली हाकलून दिलेली असते. त्याचे आम्ही निरीक्षण करावे, याची कारणपरंपरा शोधावी आणि मग त्या कंगाल दिसणाऱ्याविषयी लिहावे. जपून लिहावे, कारण या समाजाची घडी न् घडी त्या दलिताने व्यापवली आहे. अधिक काव्यमय शब्दात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, 'हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.' अशा या दलितांचे जीवन खडकातून झिरपणाऱ्या पाझराप्रमाणे असते. ते जवळ जाऊन पाहा. मग लिहा. कारण 'जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे' हे तुकारामाचे म्हणणे खोटे नाही. म्हणून दलितांविषयी लिहिणाऱ्यांनी प्रथम त्यांच्याशी एकनिष्ठ असले पाहिजे. तू गुलाम नाहीस, हे जग तुझ्या हातावर आहे, याची जाणीव करून घ्यावी. त्याचे जीवन वरच्या पातळीवर नेण्याची शिकस्त करावी आणि त्यासाठी लेखक हा सदैव आपल्या जनतेबरोबर असावा लागतो. कारण जो कलावंत जनतेबरोबर असतो, त्याच्याबरोबर जनता असते. जनतेकडे पाठ फिरवणाऱ्याकडे साहित्यही पाठ फिरवित असते. जगातील सर्वश्रेष्ठ कलावंतांनी वाङ्मय हा जगाचा तिसरा डोळा मानला आहे आणि तो डोळा सदैव पुढे व जनतेबरोबर असणे जरूर आहे." ❸ (अण्णाभाऊ साठे, 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. प्रथमावृत्ती - अण्णाभाऊ साठे जयंती, १ ऑगस्ट १९९८, पृ. क्र. ११७६, ११७७) अण्णाभाऊ साठे यांच्या या भाषणातून दलितांविषयी, दलित साहित्याविषयी, दलित साहित्य चळवळीविषयी आत्मियता प्रकट होते. दलित चळवळीने दलितांना लेखणीचे आणि वाणीचे सामर्थ्य दिले. दलित लेखक सामाजिक गुलामगिरी लादणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध, त्या व्यवस्थेने लादलेल्या पशुतुल्य जीवनाविषयी, या जीवनातील व्यथा-वेदनेविषयी लिहू लागले. जे कधीही यापूर्वी प्रस्थापितांच्या साहित्यातून कधीही आले नव्हते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकीय लोकशाही अस्तित्वात आली परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय यावर आधारलेली सामाजिक लोकशाही अस्तित्वात आली नव्हती. सवर्णांची मानसिकताही बदलली नव्हती. धर्मांतर केल्यामुळे अस्पृश्यांची हिंदू धर्माच्या गुलामगिरीतून मुक्तता झाली असली तरी सामाजिक गुलामगिरीतून त्यांची मुक्तता झाली नव्हती. अन्याय, अत्याचार, उपेक्षा, अवहेलना, वंचना हे या ना त्या रुपात चालूच होते. अशा अवस्थेत दलितांच्या संवेदना, भावना, स्फोटक बनून उद्रेकासारख्या बाहेर पडू लागल्या आणि १९६० च्या आसपास 'दलित साहित्य' आपले रूप घेऊ लागले. आपल्या विविध भाषिक स्वप्नांच्या माध्यमातून नवे आविष्कार होऊ लागले. दलित कवितेने पारंपारिक मराठी कवितेला धक्का दिला. मराठी साहित्यात आतापर्यंत न आलेले अनुभव दलित साहित्यात व्यक्त होऊ लागले. प्रस्थापित मराठी साहित्यात 'आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार रुढ होता. दलित आत्मकथनांनी त्यालाही नवे वळण दिले. जन्मापासून - अथपासून इतिपर्यंतचा इतिहासरूप जीवनवृत्तांत न देता आपण जे भोगले, अनुभवले, सोसले ते कथन करायचे अशी भूमिका दलित आत्मकथनकारांनी घेतली. दलित कविता, दलित आत्मकथनांबरोबरच दलित कादंबरी, दलित नाटक, दलित कथा, इ. पैलूंमुळेही मराठी साहित्य विश्व बदलून गेले. त्यामुळे दलित साहित्यासाठी वेगळया सौंदर्यशास्त्राची आवश्यकता निर्माण झाली.

## मराठी दलित साहित्य व जागतिक साहित्य -

निग्रोंची अमेरिकेतील 'प्लेस' आणि भारतातील अस्पृश्यांची 'पायरी' यात कोणताही फरक नाही. त्यामुळे दीर्घकाळापर्यंत दोघेही आत्महीनतेच्या आणि आत्मतिरस्काराच्या भोवऱ्यात सापडले. दोघांनाही कर्मवादाच्या कारावासात बंदिस्त ठेवण्यात आले. हा बंदिवास टिकविण्यासाठी गोऱ्या लोकांनी बायबलमधील काही मिथ्स प्रतीकांचा आधार घेतला तर येथील प्रस्थापितांनी वेदांचा, मनुस्मृतीचा आधार घेतला. निग्रोंचा वर्णविद्वेषामुळे तर अस्पृश्यांचा वर्णव्यवस्थेमुळे छळ झाला.

थॉमस पेन (Human Rights), रुसो (Social Contracts), Ralf Alison (Invisible Man), कार्ल मार्क्स (दास Capital), दक्षिण अफ्रिका, अमेरिका, इटली येथील निग्रोंच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे अब्राहम लिंकन, डॉ. नेल्सन

मंडेला; निग्रो साहित्यावर पीएच. डी. व अभ्यास करणारे म. ना. वानखेडे, डॉ. जनार्दन वाघमारे यांचं आणि रेड इंडियन, ज्यू या सर्वांचं व दलित साहित्याचं व्यथा, वेदना, विद्रोह, नकार, मानवतेसाठी वैचारिक नातं आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर या सर्वांच्या साहित्याशी दलित साहित्याचा वैचारिक संबंध आहे.

## दलित साहित्य व प्रस्थापित -

दलित साहित्याच्या स्वतंत्रपणाला जबाबदार दलितेतरांची अलिप्तता आणि उदासीनताच आहे. त्यामुळेच दलित साहित्याची निर्मिती झाल्यानंतर "हा सवतासुभा कशाला?", "हा वेगळा संसार कशाला?" अशी भाषा करण्यात आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रस्थापितांच्या लेखनात दलितांचे जीवनचित्रण थोड्याफार प्रमाणात झाले आहे. हे जर खूप आधी झाले असते तर कदाचित दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, इ. विविश्व वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले नसते. दलित साहित्याच्या स्वतंत्रपणाला 'प्रस्थापितांची मानसिकता', दलितेतर साहित्यिकांची अलिप्तता, उदासीनता, पारंपरिक वर्णव्यवस्था, पारंपरिक जातव्यवस्था, बुरसटलेली - प्रतिगामी सनातनी मानसिकता जबाबदार आहे. यासंदर्भात भालचंद्र फडके म्हणतात की, "डॉ. बाबासाहेबांना अस्पृश्यांसाठी न्याय हवा होता. दयेची, सहानुभूतीची भीक मागण्याची त्यांची वृत्तीच नव्हती. ज्या धर्मात माणुसकीने जवळ घेतले जात नाही त्या धर्माच्या नावाने शंख करीत रडण्यापेक्षा ज्या धर्मात माणुसकी, शील, चारित्र्य, संघटना, शिस्त, सौजन्य यांचा सर्वव्यापी लाभ संपादन करता येईल अशा बौद्ध धर्माचा स्वीकार करणे डॉ. आंबेडकरांना योग्य वाटले. अस्पृश्यतेचे निर्मूलन केवळ राजकीय हक्क मिळवून होईल असे त्यांना वाटत नव्हते. आर्थिक आणि सामाजिक समतेशिवाय लोकशाहीचा डोलारा उभा राहणार नाही अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणून त्यांना 'धर्मांतर' करणे म्हणजे 'नवा मुक्तिमार्ग' वाटला. 'धर्मातरा'ने त्यांनी अस्पृश्य समाजाच्या मानसिक श्रृंखला तोडल्या. 'मी आता बौद्ध आहे, मी आता माणूस आहे' या भावनेची जाणीव या धर्मांतरामुळे निर्माण झाली आणि ती हळूहळू वाढत चालली. त्यांनी हिंदू देवदेवतांचा त्याग केला, बुद्धविहार उभे होऊ लागले, प्रार्थना धीरगंभीर आवाजात होऊ लागल्या, बौद्ध महासभा स्थापन झाल्या. बाबासाहेबांनी लिहिलेल्या 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथांचा अभ्यास सुरू झाला. बौद्ध तत्त्वज्ञान समजावून देण्याची प्रक्रिया सुरू झाली. लग्नविधी, नामकरण, अंत्यसंस्कार विधी, अन्य संस्कार बौद्ध धर्माच्या अनुशासनाप्रमाणे होऊ लागले, बुद्धप्रणित नीतितत्त्वे आचरण्यात आली. धर्मांतरानंतरचे अस्पृश्य समाजातील हे बदल अतिशय अर्थपूर्ण आहेत." ❹ (डॉ. भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे. दुसरी आवृत्ती – १९८९, पृ. क्र. ११, १२) या धर्मांतरामुळे डॉ. बाबासाहेबांना आपल्या समाजाचे मन बदलता आले. त्याची अस्मिता, त्याचा अभिमान जागा करता आला. दलितांच्या वेदनेला अर्थ आला आणि त्याच्या विद्रोही भाषेमुळे प्रस्थापित हादरून गेले. प्रस्थापितांच्या अशा प्रकारच्या मानसिकतेमुळे दलितांवर जसा अन्याय झाला तसा दलित साहित्यावरही झाला.

## दलित साहित्यातील साहित्यकृती (निवडक) -

### कथासंग्रह (निवडक) –

खुळंवाडी - अण्णाभाऊ साठे
बरबाद्या कंजारी - अण्णाभाऊ साठे
गजाआड - अण्णाभाऊ साठे
स्वप्नसुंदरी - अण्णाभाऊ साठे
अमृत - अण्णाभाऊ साठे
भूताचा मळा (निवडक कथा) - अण्णाभाऊ साठे
आबी - अण्णाभाऊ साठे
बारा बलुतेदार - शंकरराव खरात

तडीपार - शंकरराव खरात
सांगावा - शंकरराव खरात
लिलाव - शंकरराव खरात
जेव्हा मी जात चोरली होती - बाबुराव बागूल
मरण स्वस्त होत आहे - बाबुराव बागूल
सूड - (दीर्घकथा, लघुकादंबरी) बाबूराव बागूल
खरवड - प्रा. केशव मेश्राम
धगाडा - प्रा. केशव मेश्राम
मरणमाळा - प्रा. केशव मेश्राम
आमनेसामने - प्रा. केशव मेश्राम
ज्वाला कल्लोळ - प्रा. केशव मेश्राम
कोळिष्टके - प्रा. केशव मेश्राम
खांडववन - प्रा. केशव मेश्राम
गुडदाणी - योगीराज वाघमारे
बेगड - योगीराज वाघमारे
उद्रेक - योगीराज वाघमारे
बेनवाड़ - वामन होवाळ
येळकोट - वामन होवाळ
वारसदार - वामन होवाळ
वाटा आडवाटा - वामन होवाळ
ऑडिट - वामन होवाळ
महासंगर - प्रा. अविनाश डोळस
पड – अमिताभ
रक्ताळलेली लक्तरे - योगेंद्र मेश्राम
जगण्याचा प्रश्न - योगेंद्र मेश्राम
निर्मळ - माधव कोंडविलकर
दलित कथा - डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. चंद्रकुमार नलगे (संपादक)
दलित कहानियाँ - डॉ. सूर्यनारायण रणसुभे, प्रा. कमलाकर गंगावणे (संपादक)
तुंबण - प्रा. अर्जुन व्हटकर
कावळयांची सुगी - प्रा. अर्जुन व्हटकर

**नाटक (निवडक) –**

युगयात्रा - प्राचार्य म. भि. चिटणीस
नोकरीच्या जाळयात - प्रभाकर गणवीर
माणुसकीचे बंड - गंगाधर पानतावणे
मृत्युपत्र - सुरेश वंजारी
पिंजऱ्यातील पोपट - प्रा. दत्ता भगत
वाटा-पळवाटा - प्रा. दत्ता भगत

ग्रामराक्षस - खुशाल कांबळे
नरबळी - कमलाकर डहार
नातं - बाबुराव गायकवाड

## कविता (निवडक) -

सनद - नारायण सुर्वे
जाहीरनामा - नारायण सुर्वे
माझे विद्यापीठ - नारायण सुर्वे
कोंडवाडा - दया पवार
गोलपिठा - नामदेव ढसाळ
या सत्तेत जीव रमत नाही - नामदेव ढसाळ
छावणी हलते आहे - अर्जुन डांगळे
गावकुसाहेबरील कविता - वामन निंबाळकर
अंगारा - नरेशकुमार इंगळे
सुरुंग - त्र्यंबक सपकाळे
ऑडीट - प्रल्हाद चेंदवणकर
नाकेबंदी - ज. वि. पवार
गावकुसाबाहेरील कविता - वामन निंबाळकर
सुरुंग - त्र्यंबक सपकाळे
उत्थानगुंफा - प्रा. यशवंत मनोहर
आंबेडकर-एक चिंतनकाव्य - प्रा. यशवंत मनोहर
मूर्तीभंजन - प्रा. यशवंत मनोहर
जीवनायन - प्रा. यशवंत मनोहर
ठिणगी - रविचंद्र हडसनकर
देणगी - रविचंद्र हडसनकर
शब्दायन - सुखराम हिवराळे
रापी जेव्हा लेखणी बनते - राम दोतोंडे
घुगऱ्या - दु. मो. लोणे
जेतवन - भगवान सवाई
वडारवाडी - परशुराम गिमेकर
मोहाडी - परशुराम गिमेकर
उत्पात - शरणकुमार लिंबाळे
श्वेतपत्रिका - शरणकुमार लिंबाळे
श्रृंखला - अशोककुमार दवणे
तडक - अशोककुमार दवणे
कारावास - अशोककुमार दवणे
कवणकाल - अशोककुमार दवणे
भटकंतीतील अभंग - अशोककुमार दवणे
उलगुलान - भुजंग मेश्राम

भूकंप - सुरेंद्र नाईक
माणूस - लक्ष्मण दांडेकर
सलोखा - श्रीधर सरपे
सलामी – एम. एम. भरणे
रेंगुट - गौतम रणवीर
आत्मशोध - गोविंदराव आढाव
महायुद्ध - विश्वलक्ष कालेकर
छेदचक्र - वामनराव जगताप
उद्वस्त - जगन्नाथ कांबळे
आठवणींचे शिलालेख - गणेश सोनाळे
आघात - संध्या रंगारी
माणसाचा जनक - दीपक त्रिभुवन
झोपडी - नागनाथ कलवले
जाब - कमल कदम
माय - कों. जो. नरवाडे
कोंड्याचा मांडा – कों. जो. नरवाडे
तरंगिनी - बलभीम तरकसे
प्रतिशोध - बलभीम तरकसे
मला हवी असणारी पहाट - प्रतिभा अहिरे
आले ढग गेले ढग - प्रल्हाद लुलेकर
दंभस्फोट - प्रकाश मोगले
चीत-पट - अनुरत्न वाघमारे
माझ्या नजरेतून बाबासाहेब - अनुरत्न वाघमारे
मुखवटे - प्रा. शिवाजी जवळेकर
अनारंभ - राजेंद्र गोणारकर
आणि सूर्य गवसला - ना. तू. पोघे
स्वीट पॉयझन - निशिकांत आलटे

## कादंबरी (निवडक) –

वारणेच्या खोऱ्यात - अण्णाभाऊ साठे
चित्रा - अण्णाभाऊ साठे
फकिरा - अण्णाभाऊ साठे
वैजयंता - अण्णाभाऊ साठे
चंदन - अण्णाभाऊ साठे
अलगुज - अण्णाभाऊ साठे
माकडीचा माळ - अण्णाभाऊ साठे
आवडी - अण्णाभाऊ साठे
गुलाम - अण्णाभाऊ साठे

वैर - अण्णाभाऊ साठे
चिखलातील कमळ - अण्णाभाऊ साठे
धुंद - अण्णाभाऊ साठे
कुरूप - अण्णाभाऊ साठे
तारा - अण्णाभाऊ साठे
अहंकार - अण्णाभाऊ साठे
मयूरा - अण्णाभाऊ साठे
वारणेचा वाघ - अण्णाभाऊ साठे
पाझर - अण्णाभाऊ साठे
रानगंगा - अण्णाभाऊ साठे
अग्निदिव्य - अण्णाभाऊ साठे
रानबोका - अण्णाभाऊ साठे
आघात - अण्णाभाऊ साठे
केवड्याचं कणीस - अण्णाभाऊ साठे
संघर्ष - अण्णाभाऊ साठे
रूपा - अण्णाभाऊ साठे
मूर्ती - अण्णाभाऊ साठे
मंगला - अण्णाभाऊ साठे
डोळे मोडीत राधा चाले - अण्णाभाऊ साठे
मास्तर - अण्णाभाऊ साठे
रत्ना - अण्णाभाऊ साठे
फुलपाखरू - अण्णाभाऊ साठे
हातभट्टी - शंकरराव खरात
बऱ्याची दिंडी - शंकरराव खरात
मी मुक्त! मी मुक्त! - शंकरराव खरात
झोपडपट्टी - शंकरराव खरात
गावचा टिनोपाल गुरुजी - शंकरराव खरात
मसालेदार गेस्ट हाऊस - शंकरराव खरात
पारधी - शंकरराव खरात
फुटपाथ नं.१ - शंकरराव खरात
सूड - बाबूराव बागुल
अघोरी - बाबूराव बागुल
कोंडी - बाबुराव बागुल
तांबडा दगड - ना. रा. शेंडे
शृंगारातले प्रेत - ना. रा. शेंडे
काजळी रात्र - ना. रा. शेंडे
विलासिनी - ना. रा. शेंडे
शुजा - ना. रा. शेंडे
गायत्री - ना. रा. शेंडे

हरिभाऊ पगारे – युगप्रवर्तक
मुक्तिसंग्राम - हिं. गो. बनसोडे
उज्ज्वला - हिं. गो. बनसोडे
आभाळाएवढे - हिं. गो. बनसोडे
अपराधी - नामदेव व्हटकर
सोळा शिणगार - नामदेव व्हटकर
बलिदान - ज.वि.पवार
हकीकत जटायू - केशव मेश्राम
पोखरण - केशव मेश्राम
हाडकी हाडवळा - नामदेव ढसाळ
श्राद्ध - उत्तम मारुती कांबळे
अस्वस्थ नायक - उत्तम कांबळे
कालगर्भ - विजय सीरसट
जातीला जात वैरी - ना. म. शिंदे
तीन भिंती - वैजनाथ कळसे
दंगल - शरणकुमार लिंबाळे
झुलवा - उत्तम बंडू तुपे
आघात - विलास अंभोरे
राघववेळ - नामदेव चं. कांबळे
जोगव्याचे दिवस - बळवंत कांबळे
इस्कोट - भीमसेन देठे
फिरस्ता - गजानन जाधव
स्मशानभूमी - कचरू भालेराव
आग - बाबुराव गायकवाड
वाडा - माधव सरकुंडे
अभिसरण - जी. के. ऐनापुरे
वडारवेदना - लक्ष्मण गायकवाड
इळनमाळ - अशोक पवार
भिन्नलिंगी - शरणकुमार लिंबाळे
उपल्या - शरणकुमार लिंबाळे
हिंदू - शरणकुमार लिंबाळे

### आत्मकथन (निवडक )

बलुतं - दया पवार
उपरा - लक्ष्मण माने
तराळ-अंतराळ - शंकरराव खरात
जिणं आमुचं - बेबी कांबळे
उचल्या - लक्ष्मण गायकवाड
आभरान - पार्थ पोळके

गबाळं - दादासाहेब मोरे
माझ्या जल्माची चित्तरकथा - शांताबाई कांबळे
मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे - माधव कोंडविलकर
कोल्हाट्याचं पोर - डॉ. किशोर शांताबाई काळे
अक्करमाशी - शरणकुमार लिंबाळे
बारामाशी - शरणकुमार लिंबाळे
राणीमाशी - शरणकुमार लिंबाळे

## दलित साहित्याने दिलेले आत्मभान -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित मुक्ती चळवळीच्या परिणामांमुळे व दलित साहित्याच्या वाचनामुळे नव्या पिढीच्या दलितांमध्ये एक विधायक परिवर्तन घडून आले. दलितांमधील शिक्षणाच्या वाढत्या प्रमाणामुळे, दलितांमधील गुणवत्तेमुळे दलितांना राष्ट्रपती, लोकसभेचे सभापती, खासदार, राज्यपाल, मुख्यमंत्री, आमदार, न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, इ. वैधानिक पदे प्राप्त करता आली. दलित मध्यमवर्गीयांमधील काहींना गुणवत्तेच्या आधारे प्राचार्य, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, पत्रकार, इ. कार्य जबाबदारीने करता आले. हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या दलितांना केंद्रात - विविध राज्यात मंत्रिपदे, विद्यापीठांचे कुलगुरुपद, विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्षपद, केंद्रीय - राज्य नियोजन आयोगाचे सदस्यत्व - मंडळाचे अध्यक्षपद, I. A. S., I. F.S., I. P. S. अधिकारी, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होण्याची संधी मिळाली.

एका बाजूने हे उल्लेखनीय परिवर्तन होत असतानाच दुसऱ्या बाजूने खेडोपाडी आजही दलितांची घरे जाळणे, खोटेनाटे आरोप करून त्यांना मारहाण करणे, महिलांवर अत्याचार करणे असे प्रकार वारंवार घडतात. सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने ही फार मोठी गंभीर बाब आहे.

भारतातील काही दलित अजूनही परंपरागत असे भंगीकाम, सफाईकाम, कातडी कमावण्याचे काम करतात. अजूनही काही ठिकाणी ब्राम्हण लोक, सवर्ण लोक दलितांसोबत खाणे-पिणे टाळतात. काही शाळांमध्ये दलित विद्यार्थ्यांना वेगळे बसविले जाते. बऱ्याच ठिकाणी शासकीय आरोग्य कर्मचारी, पोस्टमन, इ. लोक दलित वस्त्यांमध्ये जात नाहीत. काही ठिकाणी ग्रामपंचायत इमारत, पोलीस स्टेशन, रेशन दुकान, ग्रामदेवतेचे मंदिर, सार्वजनिक पाणवठा, इ. ठिकाणी दलितांना प्रवेश नाकारला जातो.

समाजात एका बाजूने सकारात्मक परिवर्तन होत असताना दुसऱ्या बाजूने बुरसटलेली विषमतावादी मानसिकता कायम असून दलितांनी आत्मसन्मानाने राहणे सनातनी-प्रतिगामी लोकांना मान्य नसल्यामुळे दलितांवर प्रचंड अन्याय-अत्याचार होत असतात. अन्याय-अत्याचार करणाऱ्यांना कायद्याची अजिबात भीती वाटत नाही हे वास्तव संतापजनक व भयावह आहे. यावर भाष्य करताना डॉ. सुधाकर शेलार म्हणतात की, "दलितत्वाची आच प्रत्यक्ष न लागलेल्या लोकांकडून दलित जीवनाच्या वास्तव चित्रणासंदर्भात कितपत अपेक्षा ठेवता येतील ? सपूर्णतः नाकारले न गेलेले लोक संस्कृतीला, परंपरेला पूर्णपणे का नाकारतील ? अशा परंपरेविरुद्ध विद्रोह का पुकारतील ? ह्या अपेक्षा ठेवणे कितपत सयुंक्तिक ठरेल हाच खरा प्रश्न आहे. कारण दलितांमधील नवसुशिक्षित वर्ग आता प्रस्थापित व्यवस्थेत हळूहळू सामील होतो आहे. त्यालाही व्यवस्थेचे गौडबंगाल समजेनासे झाले आहे. 'शिका ! संघटित व्हा ! आणि संघर्ष करा !!' या बाबासाहेबांच्या मंत्राचं हाच वर्ग मातेरं करतो आहे. त्यामुळे इतरांकडून काय आणि किती अपेक्षा करणार ? आज जागतिकीकरणानंतरच्या टप्प्यात सगळ्याच चळवळी थंडावल्या आहेत. दलित साहित्य चळवळही याला अपवाद नाही. मात्र असे असले तरीही दलित साहित्यात व समीक्षेत आजही काही घडामोडी घडताहेत ही आशावादी बाब आहे. संशोधनाच्या पातळीवरती तर दलित साहित्य व समीक्षा निश्चितच आघाडीवर आहे. डॉ. श्रीराम गडकर यांनीही याच संशोधन परंपरेत आपले योगदान देताना दलित समिक्षेला एक

वेगळा विषय व वेगळा दृष्टिकोन दिला आहे. जाणकार वाचक त्यांच्या या ग्रंथाचे नक्कीच स्वागत करतील असे वाटते.❺ (डॉ. सुधाकर शेलार, 'दलित व दलितेतरांची कथा : एक अभ्यास' - डॉ. श्रीराम गडकर) नवीन उद्योग प्रकाशन, १०२०, भवानी पेठ, पुणे. ४११००२. प्रथमावृत्ती : ३ जानेवारी २०१३, पृ. क्र. चौदा). या सामाजिक पार्श्वभूमीवर आपण दलित साहित्याच्या वाचनाने- अभ्यासाने जे आत्मभान दिले त्याकडे आपण डॉ. सुधाकर शेलार यांच्या या व्यापक भूमिकेतून बघू या. डॉ. सुधाकर शेलार यांनी दलित साहित्य व दलित साहित्याच्या भवितव्याबद्दल केलेले भाष्य चिंतनीय आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची साहित्यविषयक भूमिका मानवकेंद्रित, मानवतावादी, क्रांतिकारक होती. त्यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन मानवजातीच्या विशाल, उन्नत जडणघडणीवर भर देणारा होता. "साहित्यामुळे समाज आणि मानवाची उन्नती झाली पाहिजे. इतकेच नाही तर नीतिमत्तेचेही पोषण झाले पाहिजे. प्रत्येक ग्रंथ हा समाजाला आणि माणसाला जबाबदार असला पाहिजे. साहित्यामुळे समतेचे संवर्धन आणि विषमतेचे विध्वंसन झाले पाहिजे. साहित्य हे वैचारिक क्रांतीचे समर्थ साधन असू शकते" अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका होती. त्यांची ही साहित्यविषयक भूमिका दलित साहित्य चळवळीने स्वीकारली. त्यामुळे दलित साहित्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वविचारांचे अधिष्ठान आहे.

## संदर्भ -


१) धनंजय कीर, 'महात्मा जोतीराव फुले' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. चौथी आवृत्ती १९९२, पुनर्मुद्रण १९९६, प्रस्तावना, पृ. क्र. १०

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ', नागपूर विद्यापीठ, नागपूर. आवृत्ती पहिली १४ एप्रिल १९९१, पृ. क्र. १४७

३) अण्णाभाऊ साठे, 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाचय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. प्रथमावृत्ती अण्णाभाऊ साठे जयंती, १ ऑगस्ट १९९८, पृ. क्र. ११७६, ११७७

४) डॉ. भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे. दुसरी आवृत्ती १९८९. पृ. क्र. ११, १२

५) डॉ. सुधाकर शेलार, 'दलित व दलितेतरांची कथा एक अभ्यास' (डॉ. श्रीराम गडकर), नवीन उद्योग प्रकाशन, १०२०, भवानी पेठ, पुणे. ४११००२. प्रथमावृत्ती : ३ जानेवारी २०१३, पृ. क्र. चौदा